॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत॥

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

# NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON – 425001

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

उमवि/रुसासभा/११ए/22e /२०१८ दि.३१ मे,२०१८

प्रति,

१) मा. प्राचार्य, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित अनुदानित /शासकीय महाविद्यालये यांसी

२) मा. समन्वयक, आय क्यू. ए. सी. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित अनुदानित /शासकीय महाविद्यालये यांसी

**विषय:- राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) च्या मार्गदर्शक सूचनांनुसार आयोजित बैठकीबाबत.**

**संदर्भ:- १) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियन (रुसा) यांचा दि. १९ मे, २०१८ रोजीचा ई-मेल**

**२) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियन (रुसा) यांचा दि. ३० मे, २०१८ रोजीचा दूरध्वनी संदेश**

**महोदय / महोदया,**

उपरोक्त संदर्भांकित विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) यांचेकडून प्राप्त संदर्भिय ई-मेल व्दारे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या ज्या महाविद्यालयांचे नॅक प्रमाणित गुणांक २.५ पेक्षा जास्त (Valid NAAC Score of २.५ and above)आहे अशा अनुदानित तसेच शासकीय महाविद्यालयांच्या प्राचार्य व आयक्यूएसी समन्वयक यांचेसाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर बैठकीत राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) यांचेकडून मार्गदर्शक सूचना (RUSA २.० Guidelines) संदर्भात मा. मिता राजीव लोचन, संचालक, रुसा ह्या मार्गदर्शन करणार असून जास्तीत जास्त महाविद्यालयांनी रुसा अंतर्गत अनुदान प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीने आपले प्रस्ताव सादर करणे अपेक्षित आहे. तरी सदर बैठक **मा. प्रा. प्रदिप प्रेमचंद पाटील, कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्रा. प्रमोद पांडूरंग माहुलीकर, प्र-कुलगुरू तथा समन्वयक रुसा यांच्या उपस्थितीत दि.०५ जून, २०१८ रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात आयोजित करण्यात आली होती. तथापि, काही अपिहार्य कारणास्तव सदरची बैठक दि. ०६ जून, २०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.**

रुसा कार्यालयाकडून प्राप्त झालेली RUSA Guideline २.० विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या असून तरी सदर मार्गदर्शक सूचनांचे अवलोकन करून **दि.०६ जून, २०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता** guideline सह सर्व प्राचार्य आणि आय.क्यू. ए. सी. समन्वयक यांनी सदर बैठकीत उपस्थित रहावे, ही विनंती.

**आपला विश्वासू**

**उपकुलसचिव**
**संशोधन व विकास विभाग**

**प्रत माहितीसाठी:-**

१) मा. कुलसचिव, उमवि, जळगाव

२) मा. वित्त व लेखा अधिकारी, उमवि, जळगाव

३) मा.समन्वयक, रूसा, उमवि, जळगाव

४) मा. उपकुलसचिव, कुलगुरू कार्यालय, उमवि, जळगाव